नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७९/१९९४
सहदेव वि साऊथ कोकण बिसलरी,
नि. १७५ लगत

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.२</u>**

**<u>नारायण सहदेव राणे</u>**

**<u>शपथेवर सुरु</u>**

**<u>पुढील उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. जी. पणदुरकर यांचेतर्फे</u>**

१५. हे म्हणणे खरे आहे की, मी दाव्यासोबत दाखल केलेल्या नकाशातील 'ब' भाग हा प्रतिवादी यांच्या ताब्यात आहे. सदर 'ब' भागाचे प्रतिवादी विरुध्द कब्जाने मालक झाले आहेत याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तालुका निरीक्षक, भुमी अभिलेखमार्फत मोजणी करुन जमिनी विकलेली नाही. मी गवस व बिद्रे यांना एकच प्लॉट विकला त्या प्लॉटचा नकाशा तालुका निरीक्षक, भूमी अभिलेखमार्फत तयार केला होता. सदर नकाशा मला मिळाला तर मी तो हजर करण्यास तयार आहे. माझे काका लक्ष्मण यांनी ज्या जमिनी विकल्या त्या जमिनीचे नकाशे तयार केले किंवा कसे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे आजोबा महादेव व चुलत आजोबा शिवराम यांनी प्रतिवादीच्या 'ब' भागातील कब्जाला कधीही हरकत घेतली नव्हती. दावा जमिनीमध्ये सन १९९३-९४ मध्ये तारेचे कुंपण केले होते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादींना आम्ही जी जमिन विकली त्यातील काही भाग नाल्यात गेला होता त्यामुळे जमिनीची धुप होत होती. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादीने नाल्यात गेलेल्या भागामध्ये बाहेरुन माती आणून घातली. माती आणून घातली त्याकरीता प्रतिवादीला लाखो रुपये खर्च आला आहे याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, जेव्हा प्रतिवादीसोबत खरेदीखत केले त्यावेळी माझे आजोबा महादेव लक्ष्मण राणे हे जिवंत होते व त्यांनी प्रतिवादीला दावा मिळकतीच्या हद्दी दाखविल्या होत्या. आजोबांनी ज्या हद्दी दाखविल्या त्यानंतर दोन वर्षांनी प्रतिवादींनी त्या हद्दीवर सन १९७७ मध्ये जमिनीच्या उत्तर दिशेला मातीचे कुंपण केले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी गांवातील लोकांना गुरे नेण्यासाठी उत्तर दिशेला १० फुट रुंदीची वाट सोडण्यात आली होती. हे म्हणणे खरे नाही की, सन १९८४-८५ ते सन १९९० या कालावधीत दावा जमिनीतील 'ब' भागात प्रतिवादीने स्प्रे पॉड, पॉवर हाऊस व लगुन बांधले. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, प्रतिवादीने सन १९९३-९४ मध्ये स्प्रे पॉड, पॉवर हाऊस व लगुन बांधले आहे.

१६. माझे आजोबा हयात असताना प्रतिवादीने आमच्या जमिनीत अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतरही प्रतिवादीने कधीही आमच्या जमिनीत अतिक्रमण केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दाव्यात खोटे कारण नमुद करुन प्रतिवादीविरुध्द दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५/७/१९९४ रोजी मी प्रतिवादीला दिलेली नोटीस खोटी आहे.

१७. उत्तम परब, लॉरेन्स रॉड्रीक्स, नारायण मोरजकर, सखाराम गांवकर यांना मी ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्या गांवातील आहेत व दावा जमिनीपासून जवळच रहातात. हे म्हणणे खरे नाही की, उत्तम परब, लॉरेन्स रॉड्रीक्स, नारायण मोरजकर, सखाराम गांवकर यांनी त्यांच्या शपथपत्रामध्ये नमुद केलेला मजकुर खरा आहे. सदर शपथपत्रांमध्ये उल्लेख केलेला प्रतिवादीचा असलेला ताबा सन १९९३–९४ या कालावधीतील आहे.

**प्रतिवादीतर्फे वकीलांच्या तोंडी विनंतीवरुन साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**.

श्रवणोत्तर स्वीकृत
सही/–
(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.

दिनांक – १९/१२/२०२५